# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २७/१०/२०२४ (रविवार) सकाळ


---

### पोस्टे अरोली हद्दीतील मौजा धर्मापुरी परिसरात
### अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर कायदेशिर कार्यवाही

आज दि. २६/१०/२०२४ रोजी पोस्टे अरोली येथील स्टाफ पो.स्टे. हद्दीत प्रोव्हीशन, जुगार रेड कामी सरकारी वाहनाने पेट्रोलींग करीत असता, मौजा धर्मापुरी येथे मुखबिरद्वारे खबर मिळाली कि, धर्मापुरी शेत शिवारात जयदेव आंबिलढुके याचे शेत तळयाचे बाजुला झोपडीचा मागे तिन इसम भट्टी लावुन दारु गाळत आहे. अशा मिळालेल्या खबरेवरून पोलीस स्टाफ यांनी लपत छपत जावुन रेड केली असता, दोन इसम झोपडीचा मागे विटामातीच्या चुलीवर भट्टी लावुन दारु गाळतानी मिळुन आल्याने **आरोपी नामे—१) सत्यवान विठोबा चारमोरे वय ७० वर्ष २) रूपेष सत्यवान चारमोरे वय २३ वर्ष रा. धर्मापुरी ता. मौदा, जि. नागपूर त्यांना विचारपुस केली असता आरोपी क्र. २ रूपेष सत्यवान चारमोरे याने सांगितले की, शेतमालकाचा मुलगा आरोपी क्र. ३) बबन जयदेव आंबिलढुके** यांचे सहमतीने शेताचा तळयाचा बाजुला झोपडीचा मागे मोहाफुल हातभट्टीची दारू गाळत असल्याचे सांगितले. घटनास्थळाची पाहणी केली असता, घटनास्थळावरून (१) आठ प्लॅस्टीक बॅग मध्ये मोहाफुल सडवा प्रत्येकी बॅग मध्ये ५० कीलो प्रमाणे ४०० कीलो कींमती ३५/—रू किलो प्रमाणे कींमती १४,०००/— रू २) मोठ्या काळया रंगाचा ३ रबरी टयुबमध्ये मोहाफुल गावठी हातभट्टी दारू प्रत्येकी टयुब मध्ये ७० लीटर प्रमाणे एकुन २१० लिटर दारू प्रत्येकी १००/—रू लीटर प्रमाणे कीमती २१,०००रु, ३) तिन प्लॉस्टिक डबकीत २० लिटर प्रमाणे ६० लिटर कि. ६०००/—रू ४) लोखंडी ड्रम किंमती ५००/— रु ५) जर्मन कतली किंमती ५००/—रू, ६) एक प्लॅस्टीक पाईप किंमती ५०/—रू ७) एक जर्मन बालटी कि. १००/—रू ८) स्टिलची झाकणी किंमती ५०/—रू. असा एकुण ४२,२००/—रु चा माल मिळुन आल्याने पो.हवा. श्याम पोकळे यांनी दोन्ही आरोपीतांचे ताब्यात मिळालेला वरील प्रमाणे मुद्देमाल आरोपीचे ताब्यातुन जप्त केले. आरोपीचे कृत्य हे कलम ६५ (बी), (सी), (ई), (एफ) ८३ महाराष्ट्र दारूबंदी कायदयान्वये होत असल्याने आरोपी १) सत्यवान विठोबा चारमोरे वय ७० वर्ष २) रूपेष सत्यवान चारमोरे वय २३ वर्ष ३) बबन जयदेव आबिलढुके वय ४६ वर्ष तिन्ही रा. धर्मापुरी ता. मौदा. जि. नागपूर यांचे विरूद्ध पोस्टे अरोली येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण श्री हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से), मा. अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामिण श्री. रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक श्री. रमेश बरकते यांचे मार्गदर्शनात पोस्टे अरोली येथील ठाणेदार श्री. स्नेहल राउत, सह पो.स्टाफ पो.हवा. श्याम पोकले, पो.हवा संदीप बाजनघाटे पो.कॉ. चावेरे, सह पो.स्टे. अरोली यांनी पार पाडली.



## रामटेक परीसरात सुरु असणाऱ्या वेश्याव्यवसायावर धाड टाकून देहव्यापार करणाऱ्या पिडीत महिलेची सुटका करून आरोपीतांना केले अटक नागपूर ग्रामीण पोलीसांची धडक कारवाई

पोलीस स्टेशन रामटेक हद्दीतील हॉटेल गॅलेक्सी नगरधन रोड येथे मुलींना वेश्याव्यवसाय करण्यास आणुन वेश्याव्यवसाय सुरु असल्याबाबत गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाल्याने दिनांक २६/१०/२०२४ रोजी चे १८.१५ वा. ते २०.३० वा. दरम्यान पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टॉफ सह हॉटेल गॅलेक्सी नगरधन रोड येथे छापा कार्यवाही करण्यात आली असता सदर होटेल मध्ये अनैतिक देहव्यापार चालवत असल्याची खात्री झाल्याने **आरोपी नामे– आशिषकुमार सुखचंद डेहरवाल वय २४ वर्ष रा. कन्हाडगाव ता. तिरोडी जि. बालाघाट सदर हॉटेलचा मालक नामे– मनोज रमेश लिल्हारे रा.आजनी ता. रामटेक जि. नागपूर** यांनी संगनमत करून पिडीत महिलेस पैशाचे आमीष दाखवुन वेश्याव्यवसाय करण्यास एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हॉटेल गॅलेक्सी नगरधन रोड येथे बोलावून हॉटेल गॅलेक्सी नगरधन रोड मधील रुम कुंटणखाना म्हणून वापरण्यास हेतुपुरस्सर परवानगी देवुन पिडीत महिलेस वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त केले. आरोपीतांविरुध्द कलम ३, ४, ५, ७ स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार प्रतीबंधक अधिनियम १९५६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी क्र. १) यास अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा), मा. श्री. रमेश धुमाळ अप्पर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा), मा. उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक श्री. रमेश बरकते यांचे मार्गदर्शनात पोस्टे रामटेक येथील ठाणेदार पोनि आसाराम शेटे व सपोनि फाल्गुन घोडमारे, पोउपनि हरीचंद्र मोरे, मपोहवा जोत्सना मसराम, पोना प्रफफल रंधई, मंगेश सोनटक्के, उमेश गाढवे, अर्पित पसिने, पोशि शरद गिते, शिवशंकर भोयर, योगेश कुईटे यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर